**मे. अलतगे स्टोन क्रशिंग इंडस्ट्रिज यांच्या मौजे कुरवडे - मारळ, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथील बॉक्साईट खाणीच्या विस्तारिकरणा बाबतच्या लोक सुनावणीचा इतिवृत्तांत..**

**स्थळ** : कुरवडे फाटा, मौजे - कुरवडे,
ता. श्रीवर्धन, जि रायगड.

**दिनांक** : २६ ऑक्टोबर, २०१५.

**वेळ** : सकाळी ११:०० वाजता.

मे. अलतगे स्टोन क्रशिंग इंडस्ट्रिज यांच्या मौजे कुरवडे - मारळ, ता. श्रीवर्धन, जिल्हा रायगड येथील बॉक्साईट खाणीच्या १२००० टन प्रतिवर्ष पासून ८९५८६ टन प्रतिवर्ष इतक्या विस्तारिकरणा संदर्भात लोक सुनावणी दिनांक २६/१०/२०१५ रोजी सकाळी ११:०० वाजता श्रीमती शीतल तेली-उगले, जिल्हा दंडांधिकारी तथा जिल्हाधिकारी रायगड, जिल्हा रायगड यांच्या अध्यक्षतेखाली कुरवडे फाटा, मौजे कुरवडे, ता. श्रीवर्धन, जिल्हा रायगड येथे आयोजित करण्यांत आली होती. श्री.समेळ, उप विभागीय अधिकारी, श्रीवर्धन यांनी पुष्पगुच्छ देऊन मा.जिल्हाधिकारी यांचे स्वागत केले.

**उपस्थितांची नावे –**

| | | |
|---|---|---|
| श्रीमती. शीतल तेली-उगले | : | जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी, रायगड. |
| श्री.तेजस समेळ | : | उप विभागीय अधिकारी, श्रीवर्धन, जि.रायगड |
| श्री. मेश्राम | : | जिल्हा खनिकर्म अधिकारी, रायगड |
| श्री. डॉ. अनंत हर्षवर्धन | : | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, रायगड. |
| श्री. सागर औटी | : | समन्वयक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, महाड. |

श्री. डॉ. अनंत हर्षवर्धन यांनी उपस्थित अध्यक्षा व ग्रामस्थ यांचे स्वागत करुन लोक सुनावणीला सुरुवात केली. त्यानंतर श्री. सागर औटी यांनी आजची जाहीर लोक सुनावणी मा.अध्यक्षा उगले मॅडम, जिल्हा दंडाधिकारी, रायगड यांच्या परवानगीने सुरु करण्यात येत आहे असे सांगुन उपस्थित नागरीकांचे म.प्र.नि.मंडळ व जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांच्यातर्फे स्वागत केले. लोक सुनावणी बाबतची प्रस्तावना लोकांना सांगीतली. सदरिल प्रस्तावनेमध्ये श्री.औटी यांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांच्या १४/०६/२००६ च्या अधिसूचनेनुसार सदरील लोक सुनावणी घेत असल्याबाबत सांगीतले. तसेच दिनांक २५/०९/२०१५ च्या दैनिक, 'रायगड टाईम्स' या मराठी वृत्तपत्रात तसेच दिनांक २५/०९/२०१५ च्या दैनिक 'इंडियन एक्सप्रेस' या इंग्रजी वृत्तपत्रात सदरिल लोक सुनावणीची जाहीर नोटीस प्रकाशित केलेबाबत माहीती दिली. सदरील नोटीस प्रकाशित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आक्षेप व सूचना नोंदवायच्या असतात याबाबत उपस्थितांना सांगितले. वृत्तपत्रात नोटीस दिल्यानंतर मंडळाकडे पाच पत्रे प्राप्त झाली आहेत. ही जाहिर सुणावणी घेण्यासाठी गठीत समितीचा आदेश क्र.४४४९, ई-२२५ दि.१७/१०/२०१५ रोजी मंडळाच्या मा.सदस्य सचिवांनी निर्गमीत केला आहे असे सांगितले. उपस्थितांनी आपले नाव व गावाचे नाव सांगुन प्रश्न मांडावेत. प्रकल्पधारक प्रश्नाचे उत्तरे देतील. याचे इतिवृत्त तयार करुन मंडळाच्या मुख्यालयात पाठविण्यात येईल. कोणताही निर्णय घेण्याचे अधिकारी या समितीस नाहीत. इतिवृत्त समितीमार्फत राज्यस्तरीय विशेषज्ञ मुल्यांकन

समिती यांच्याकडे पाठविले जाईल असे स्पष्ट केले. तद्नंतर प्रकल्पधारकास प्रस्तावित प्रकल्पाविषयी सादरीकरण सुरु करणास सांगितले.

त्यानंतर प्रकल्पकर्ते यांच्या तर्फे श्री शांतनू पुराणिक, सृष्टीसेवा यांनी प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती संगणकीय सादरीकरणाद्वारे उपस्थितांना सांगितली. त्यानंतर श्री. अनंत हर्षवर्धन यांनी उपस्थितांना सादरीकरणाबाबत काही शंका, आक्षेप अगर हरकति विचारण्याबाबत सांगितले. त्या अनुषंगाने उपस्थित नागरीकांनी विचारलेले प्रश्न व त्याचे प्रकल्पकर्ते व इतर यांनी दिलेले उत्तर खालीलप्रमाणे-

**प्रश्न १ :** **अजित शंकर भाटकर (बागमांडला)**
यांनी जनसुनावणी गावात घेतल्यामुळे मा. जिल्हाधिकारी व इतर शासकीय अधिकारी यांचे ५० टक्के आभार मानले. स्थानीक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द न केलेबद्दल हरकत नोंदविली. शेतकरी रायगडचे आहेत आणि रायगड आवृत्तीला जाहिरात दिलेली नाही यांचा त्यांनी निषेद नोंदविला. इंग्रजी वृत्तपत्रात जाहिरात देऊ नका. दै.रायगड टाईम्स मध्ये जाहीरात असेल तर मी तुमचे २०० टक्के आभार मानतो. बेकायदेशीर उत्खनन चालु असून कोणतेही उपाय योजना केलेल्या नाहीत. प्रशासकीय अधिकारी यांनी खाणकामाच्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करावी असे सुचविले.

**उत्तर :** स्थानीक वृत्तपत्र दैनिक 'रायगड टाईम्स' च्या दिनांक २५/०९/२०१५ आवृत्ती मध्ये जाहिरात आल्याबाबत प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, रायगड यांनी निदर्शनास आणून दिले. त्यात प्रकल्पा विषयीचे दस्ताऐवज अभ्यासण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालये, जिल्हा परीषद, ग्रामपंचायत कार्यालय इत्यादी ठिकाणी उपलब्ध ठेवण्यात आले होते असेही सांगितले.

**प्रश्न २ :** **राजकुमार चव्हाण (हरिहरेश्वर)**
अलतागे स्टोन क्रशिंग कंपनीने खाणकामासा संबंधी अटी व शर्तीचे पालन केलेले नाही. शेतकऱ्यांच्या जमिनीबाबत अत्यंत अल्प मोबदला दिला गेला. रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करार केलला आहे. ७/१२ अद्ययावत नाही. मायनिंग चालू झाल्यामुळे जंगली प्राणी हे गावाकडे स्थंलातरीत झाले. बॉक्साईट वाहतुकीमुळे अपघातांचे प्रमाण वाढले. मायनिंगच्या ठिकाणी पुर्नभरण व वुक्षारोपण झालेले नाही. एकही झाड लावले नाही. उत्खनन ५ मीटर पेक्षा जास्त होत आहे. कार्यालयामध्ये बसून पंचनामे होतात. जनसुनावणीबाबत ग्रामपंचायत कार्यालयात वृत्तपत्राची पूर्ण आवृत्ती न ठेवता फक्त वृत्तपत्रात आलेल्या जाहीरातीची छायांकित प्रत ठेवण्यांत आल्याबाबत आक्षेप नोंदवला. समूद्राचे अंतर ५०० मीटर असल्याचे सांगीतले. प्रकल्पाने सध्याचालू असलेल्या खाणींसाठी सर्व परवानग्या घेतल्या आहेत का? अशी विचारणा केली. एमपीसीबीचे अधिकारी प्रकल्पाबाबत पाहणी करत नाही असा आक्षेप घेतला. त्यामुळे या प्रकल्पास स्थानिकांचा विरोध आहे, पुढची अनुमती देऊ नका असे सांगितले.

**उत्तर :** प्रादेशिक अधिकारी, डॉ. हर्षवर्धन यांनी असे सांगितले की, उपप्रादेशिक कार्यालय महाड येथील अधिका-यांनी वेळोवेळी प्रकल्पाची पाहणी केलेली आहे. तसेच कंपनीस कायदेशीर नोटीसा देखिल बजावल्या आहेत. प्रकल्पासाठी लागणा-या सर्व परवानग्या घेतल्याबाबत प्रकल्पकर्त्यांनी सांगीतले. नियमानुसार प्रकल्पाविषयीच्या दस्तऐवज अभ्यासण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालये, जिल्हा परीषद, ग्रामपंचायत कार्यालय इत्यादी ठिकाणी उपलब्ध ठेवण्यात आले होते असेही सांगितले.
श्री. शांतनू पुराणिक यांनी उत्तर देताना सांगितल की, आजची जाहीर सुनावणी ही प्रकल्पाची उत्पादन क्षमता वाढी साठी आहे. प्रकल्पासाठी शासकीय जमीनीचे संपादन शासकीय प्रक्रीया पूर्ण करुन केले आहे तसेच खाजगी जमीनीवर जमिन मालकांच्या परस्पर समन्वयाने

परवानग्या घेवून काम करण्यांत येत आहे सर्वांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची इतिवृत्तामध्ये नोंद करण्यांत येत आहे व ते फायनल इआए/इएमपी रिपोर्ट मध्ये अंतर्भूत करण्यांत येतील.

**प्रश्न ३ :** **अरविंद भोजने (कुरवडे)**

उत्खनन करायचे की नाही हे गावतील लोक ठरवतील. कुरवडे गाव ३०० मीटर अंतरावर आहे. पुणे जिल्हातील माळीण गावासारखी दुर्घटना येथेही होऊ शकते. धुळ नियंत्रणासाठी यांनी काय केले ? किती भुमीपुत्रांना नोकऱ्या दिल्या ? मायनींगचे काम १५ वर्षांपासून चालू असुन कंपनीने ग्रामस्थ व गावासाठी कोणत्या प्रकारची आर्थिक मदत केली त्याची माहिती मिळावी. तसेच आम्ही गावाच्या मंदिरासाठी रु. १५,००,०००/- ची मागणी केली होती. परंतू कंपनीने फक्त रु.६,००,०००/- कबुल केले व त्यापैकी ५० टक्के रक्कम दिली. रस्त्याचे काम करुन देण्याचे मान्य केले. परंतु ते काम केले नाही.

**उत्तर :** प्रकल्पकर्ते यांनी असे सांगीतले की वेळोवेळी लोकांचे प्रश्न सोडवतो, मंदिरासाठी रक्कम रु. ६,००,०००/- मंजुर केले आहेत, त्यापैकी रु. ३,००,०००/- अदा करण्यात आले आहेत व उर्वरित रक्कम कामाचे प्रगतीनुसार देण्यात येईल व रस्त्यासंबंधीचे काम जानेवारी २०१६ पासून सुरू होईल. या प्रकल्पाच्या उत्पादन क्षमतेनुसार सी.एस.आर. कार्यक्रम करण्यांत आलेले आहेत. ग्रामस्थांच्या अपेक्षेप्रमाणे पूर्णपणे सी.एस.आर. कार्यक्रम करण्यांत आलेला नाही. वाढीव प्रस्तावानुसार सी.एस.आर उपक्रमाखाली दर वर्षी रु.९,००,०००/- खर्च करण्याचा मानस आहे असे सांगितले.

**प्रश्न ४ :** **जनार्दन पडयाळ (कुरवडे)**

सदर वाढीव उत्खननास परवाणगी दयायची की बंद करायची हे आम्ही ठरवणार. प्रकल्पाची क्षमता १२००० प्रति वर्ष आहे. परंतु वास्तविक उत्पादन १ लाख टन प्रति वर्ष इतके होत आहे. धुळ नियंत्रणासाठी प्रकल्पानी सिंचक बसविलेत काय ? आरोग्य विषयक किती शिबीरे लावलेत ? दहा ते बारा लोक क्षय रोगाने(टी.बी) मेले. कुरवडे गाव हे मायनिंगच्या पायथ्याशी १ कि.मी. अंतरावर आहे. मागील ६ वर्षात कंपनीने गावाच्या विकासाठी काय योगदान दिले? रस्ता हा अवजड वाहतुकीमुळे खराब झालेला आहे? स्फोटकामुळे नैसर्गिक झरे लुप्त झाले आहे. त्यामुळे गावात पाणीटंचाई आहे. कंपनीच्या आर्थिक व्यवहारात पारदर्शकता नाही. मायनिंगमुळे रहिवासीच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे? त्यांची शेती व इतर फळझाडे यांचे नुकसान झाले आहे. इत्यादी.

**उत्तर :** प्रकल्पकर्ते यांनी स्फोटकाद्वारे उत्खनन करण्याऐवजी रिपर डोझरचा वापर जास्तीत जास्त करण्यांत येईल असे सांगितले. तसेच स्फोटाद्वारे उत्खनन करण्याची गरज भासल्यास कंट्रोल ब्लास्टींग या पध्दतीचा अवलंब केला जाईल व त्यामध्ये मि.ली. सेकंदा एम. एस. डिले डिटोनेटर यांचा वापर केला जाईल असे सांगीतले. धुळ नियंत्रणासाठी वॉटर स्प्रिंक्लरचा वापर करण्यात येईल असे सांगीतले. वृक्षारोपण करण्यात येईल.

**प्रश्न ५ :** **अरविंद भोजणे (कुरवडे)-**

कंपनीने १५ वर्षात किती स्थानिंकाना रोजगाराच्या संधी दिल्या. पाणीप्रश्नाबाबत काय करणार ? भारत निर्माण अंतर्गत गावक-यांनी विहीर खोदली, परंतू ती ब्लास्टिंगमुळे प्रदूषित झाली. पाणी पिण्यायोग्य राहीले नाही. प्रकल्प ९ वर्षामध्ये ३ लाख देणार असेल तर कशावरुन ९ लाख प्रतिवर्ष गावास मिळतील ? गावात पाणी टंचाई आहे. त्यासाठी काय करणार ?

**उत्तर :** प्रकल्पकर्ते यांनी कंपनीने कुरवडे गावातील कुशल व अकुशल अशा श्रेणीत एकूण २ लोकांना रोजगार उपलब्ध करुन दिल्याचे सांगीतले. सी.एस.आर. उपक्रमाखाली पिण्याच्या पाण्यासाठी आणि इतर खर्चासाठी दरवर्षी रुपये ९ लाख देण्यात येतील असे सांगितले.

**प्रश्न ६ :** **श्रीमती. पदमश्री बुरुणकर (कुरवडे)**

पाणी प्रश्न व आरोग्याबाबत प्रश्न विचारला. गावातील मुले आजारी पडतात. तसेच मायनिंगमुळे डोंगर खचण्यासंबंधी भिती व्यक्त केली. रस्त्यावर अवजड वाहनामुळे चालणे अवघड झाले आहे. अशा प्रकल्पाचा गावाला काय फायदा ?

**उत्तर :** प्रकल्पकर्ते यांनी गावाचा पाणी पुरवठयाचा प्रश्न सोडवला जाईल असे आश्वासित केले. बोअरवेलची व्यवस्था करण्यात येईल असे सांगितले.

**प्रश्न ७ :** **दशरथ लक्ष्मण लोंखडे(कुरवडे)-**

अतिवृष्टीमुळे ५ वर्षापूवी पाण्यासोबत चिखल माती रस्त्यावर येवून दलदल निर्माण झाली होती, त्यामुळे ग्रामस्थांना जाणे येणे कठीण झाले होते. लोके पाय घसरुण पडत होते. डोंगर कोसळला तर काय करणार ? ९ वर्षांपासुन कंपनीचे मायनिंगचे काम सुरु आहे. यांनी ३ लाख कोणाला दिले ? राजकारणी घेऊन जातात; पोट भरतात गाव मुग गिळुण शांत बसले. कोणाची गाय मरते, बैल मरतो, प्रकल्पास यांचे देणे घेणे नाही. तुमच्या ९ लाखांचे आम्ही भुकेले नाही. परंतू कंपनीने या कालावधीत गावाच्या विकासासाठी काहीही केलेले नाही, तसेच मायनिंगच्या कामाबाबत नाराजी व्यक्त केली.

**प्रश्न ८ :** **नरेश पुलेकर (हरी हरेश्वर)-**

मायनिंग कामामुळे १० किमी च्या परिसरात नुकसान झाले आहे. वन्य प्राणी गावात येवून फळझाडांचे नुकसान करतात. नारळ, आंबा, सुपारी बागांचे नुकसान झालेले आहे. डेड माईन्सवर भराव टाकला का ? झाडे किती लावली ? प्यायला पाणी नाही तर सिंचकासाठी पाणी कुठुण आणनार ? बंद झालेल्या माईन मध्ये किती माती टाकली व त्यावर किती झाडे लावली या बाबतची माहीती मिळावी. शासनाने उत्खनन संदर्भात दिलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे, एम.पी.सी.बी. व महसूल अधिकारी यांनी नियंत्रण ठेवावे. मायनींग परवानगी देताना शासनाने १० कि. मी. परिक्षेत्रातील गावांची ग्रामसभेची परवानगी घेण्यात यावी. मायनिंगचे करणा-याचे नाव आशापूरा वरुन अलतगे करण्यांत आले. कंपण्याची नावे बदलली जातात; मे.आशापुरा कंपनीचे अधिकारी कोण आहेत ?

**उत्तर :** प्रकल्पकर्ते यांनी असे सांगीतले की, कंपनीचे नाव बदलण्यांत आले नाही. तर अलतगे स्टोन क्रशिंग कंपनी ही उत्खनन करते व आशापुरा कंपनी ही त्यांच्याकडून माल विकत घेते. मे. आशापुरा ही सांघिक कंपणी आहे.तसेच अजून पर्यंत एकही माईन पूर्ण बंद करण्यांत आलेली नाही.

**प्रश्न ९ :** **सुनील खळे (मा. उपसरपंच, मारळ)-**

९ वर्षांपासून कंपनीने मायनिंगचे काम चालु केलेले आहे. यापूर्वी बॉक्साईट वाहतुक ही कुरवडे जेटी येथून केली जात होती. परंतू नंतर सदरची बॉक्साईट वाहतूक दिघी पोर्ट येथून चालू करण्यात आली. वाहतुक करणारे ट्रक हे ओव्हरलोड, अकुशल ड्रायव्हर यांमुळे मोठ्या प्रमाणात अपघातांचे प्रमाण वाढले आहे. मुले, जनावरे मेली आहेत. रानचा मेवा, करवंदे, आंबा, शेती खराब झाली आहे. जिलेटीन मुळे एका मुलीची हाताची बोटे तुटली, ती अंपग झाली. रॉयल्टी पैकी मारळ ग्रामपंचायतीस किती निधी मिळाला ? आरोग्य शिबीरे किती लावली ? बॉक्साईट वाहतुकीमुळे वन खात्याच्या रस्त्यावर अतिभार वाहतुक होते. अपघात वाढले आहे. बाण गंगा धरणाखाली उत्खनन चालु झाले. स्थानिकांना रोजगार नाही. कंपनी शेतक-यांची फसवणूक करुन अल्पदरात जमीनीचा करार करते. कंपनी अंगणवाडीसाठी रु. ३,००,०००/- महिला सबळीकरण योजना रु. १,००,०००/- शालेय विद्यार्थी यांना ड्रेस रु. १,००,०००/-, आरोग्य शिबिरासाठी रु. १,००,०००/- व रस्ता दुरुस्तीसाठी रु. १,५०,०००/- असा वार्षिक निधी असताना तो कंपनीने खर्च केलेला नाही. वन्य प्राण्यांचा गावक-यांना त्रास

होतो. रोजगाराची संधी उपलब्ध होत नाही. बॉक्साईट निर्यात न करता शासनाने इथेच रिफायनरी (महाराष्ट्रात) सुरु करावी.

उत्तर : प्रकल्पकर्ते यांनी असे सांगीतले की श्री. खळे यांनी उल्लेख केलेली खर्च करण्यांची रक्कम ही प्रस्तावित प्रकल्पासाठी आहे व ती प्रस्तावित प्रकल्प सुरु झाल्यानंतर खर्च करण्यांत येईल. तसेच असे सुचविले की ग्रामस्थांनी अपघात थांबविण्यासाठी व पर्यावरण रक्षणासाठी त्यांच्या काही प्रतिनिधींची एक समिती स्थापन करावी व समितीच्या मार्फत गरजेप्रमाणे सदरच्या निधीचा वापर करावा.

प्रश्न १० : **अरविंद भोजने (कुरवडे)-**

कंपनी मंजूर क्षमतेपेक्षा जास्त उत्पादन करते त्यासाठी त्यांचे दैनिक रेकॉर्ड तपासावेत त्यामुळे प्रत्यक्ष किती उत्पादन होते ते लक्षात येईल. तसेच कंपनीने कुरवडे संबंधिची बॅलन्सशिट दाखवावी त्यामुळे त्यांचे वार्षिक उत्पादन लक्षात येईल तसेच सी.एस.आर. साठी मंजूर रुपये ९,००,०००/- न देता त्यांनी वार्षिक उत्पादनाच्या प्रमाणात गावच्या विकासासाठी निधी द्यावा.

प्रश्न ११ : **नथुराम सावंत (कुरवडे)-**

कंपनीचे उत्खननाचे काम सुरु झाल्यापासून नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत कमी झाले आहेत व गावात बोअरवेल खोदली असता पाणी लागत नसल्याबाबत सुचित केले. एप्रिल-मे महिण्यापासून बोअर वेलला पाणी येत नाही. प्रत्यक्ष पाहणी केल्या नंतर प्रकल्पाने क्षमतेपेक्षा जास्त उत्खनन केल्याचे निदर्शनास येईल.

प्रश्न १२ : **निजामउद्दीन जलाल (पर्यावरण प्रेमी, महाड)-**

मायनींगमुळे भूगर्भीय पाणीसाठा कमी झालेला आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. कोकण विभाग अतिवृष्टीचा भाग असल्याने स्फोटकाद्वारे उत्खनन केल्यामूळे येथे भू:स्खलन होऊ शकते. बॉक्साईट वाहतूक व मायनिंगमुळे निर्माण झालेल्या धुळींमुळे पिकांचे व फळबागांचे नुकसानीबाबत पंचनामा करुन त्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी केली.

प्रश्न १३ : **राजकुमार चव्हाण- (हरिहरेश्वर)**

साईटवर वजनकाटा नसल्यामुळे ओव्हर लोड वहातुक केली जाते. यासाठी कंपनी जबाबदार आहे. मागील अटी व शर्ती पुर्ण केल्याशिवाय कंपनीला पुढील वाढीव खाणकाम करण्याचे परवानगी देवू नये.

प्रश्न १४ : **अजित भाटकर- (बागमांडला)**

सुप्रिम कोर्टची ऑर्डरची अवमानना केली. गुरेचरण किंवा गायरानवर कोणत्याही प्रकारची उत्खनन करता येत नाही. जर उत्खनन झाले असेल, तर कंपनीला दंड करावा.

प्रश्न १५ : **संदिप जाधव (हरिहरेश्वर)**

प्रकल्पाचे अधिकारी अपघात झाल्यास पैसे देतो असे सांगतात, नंतर देत नाहीत. त्यांना माणसांची किंमत राहीली नाही. सदरील खाणींवर कारवाई न केल्यास आम्ही हरित लवादाकडे दाद मागू.

प्रश्न १६ : **अजित भाटकर (बागमांडला)**

प्रकल्पाच्या ठेकेदारांनी ठेवलेल्या मजूरांनीच दिवेआगर येथील सुवर्ण गणेश मूर्ती चोरल्याबाबतचा संशय व्यक्त केला व ठेकेदार तसेच त्यांच्या कामाला असलेल्या मजूरांची सर्व माहीती स्थानिक पोलीस व तहसिलदार यांना देण्यांत यावी असे सुचविले.

**प्रश्न १७ :** **संतोष जाधव (पत्रकार)**

प्रस्तावित प्रकल्पाच्या जागेच्या काही ७/१२ वर वनेतर कामास बंदी व वने असा शेरा आहे. तरी याबाबत काय कार्यवाही करण्यांत येईल.

**उत्तर :** मा. अध्यक्षा तथा जिल्हादंडाधिकारी यांनी या सर्व बाबी तपासून कार्यवाही करण्याचे अश्वासित केले.

**प्रश्न १८ :** **मकसूद नजिर (श्रीवर्धन)**

जे उत्खनन गायरान जागेत झालेले आहे, त्यावर प्रशासनाकडून काय कार्यवाही केली जाईल?

**उत्तर :** मा. अध्यक्षा तथा जिल्हा दंडाधिकारी यांनी पंचनामे करुन दंड लावला जाईल व कारवाई केली जाईल, असे सांगीतले.

जाहिर नोटीसला अनुसरुन मंडळाकडे आणि सुणावणी दरम्यान खालील नागरीकांकडून लेखी हरकती प्राप्त झालेल्या आहेत. त्या सोबत जोडल्या आहेत. त्यांची नावे आणि सारंश रुपात हरकतीचे स्वरुप खाली नमुद केले आहे.

१) **श्री.आदेश कृष्णा पाटील, रा.श्रीवर्धन दांडे, ता.श्रीवर्धन, जि.रायगडः**

- गावच्या पिण्याचे पाणी दुषित झाले आहे. पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बंद झाले असून टँकर व्दारे पाणी पुरवठा केला जातो.
- विना परवाना फॉरेस्टच्या हद्दीतुन बॉक्साईटची वाहतुक व उत्खनन होत आहे. ३५ सेक्शन मध्ये उत्खनन होत आहे.
- मोठमोठे उत्खनन केल्याने खडयामुळे गुरे ढोरे मृत्यूमुखी पडत असून झाडांची कत्तल होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. या सर्व गोष्टीचा दुरोगामी परीणाम पावसावर झाला आहे.
- मागील १० वर्षापुर्वी कंपनीने जो पर्यावरणाचा त्रास होणार नाही याची काळजी घेणारा प्लॅन सरकारला दिला होता त्याची अंमलबजावणी न केल्याने होणारे परीणाम जनतेला भोगावे लागत आहेत. फुफुसाचे रोग, लहान मुलांना आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे.
- कंपनीने झाडांची लागवड केली जाते असे दाखवले जाते परंतु ते तात्पुरत्या स्वरुपाचे असते नंतर झाडाची देखभाल केली जात नाही. झाडे जगवली जात नाहीत. सर्वत्र धुळीचे साम्राज्य असते.
- सुमारे १० ते १३ वर्ष कंपनी मेघरे, कुरवडे, सायगाव, खुजारे या सारख्या माईन्स चालवते. आजतागायत लाखो टन माल कंपनीने उत्खनन केले परंतु या गावात कोणतेही विकासाचे काम केले नाही. कृपया आपण कंपनीचा डेली प्रॉडक्शन रीपोर्ट मागील दहा वर्षाचा तपासून पाहील्या नंतर कळेल की, भरलेली रॉयल्टी व प्रॉडक्शन केलेला माल या मधील तफावत किती आहे व त्याच प्रामाणे प्रत्यक्ष माईन्सवर किती आहे.
- रोजगाराची संधी गावकऱ्याना देण्याचे कंपनीने आपल्या करार नाम्यात लिहले आहे. परंतु प्रत्यक्ष माईन्सवर गावकऱ्यांना रोजगार मिळत नाही. सर्व ठिकाणी मशनरीचा वापर करत आहेत.

- अत्यल्प दराने शेतकऱ्याच्या जमिनी करारावर घेण्यात आल्या. सहा हजार ते बारा हजार रुपये ऐकर या भावने शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात आल्या. कंपनी मात्र डॉलरच्या भावाने पैसे कमवत आहे. १८०० ते २००० करोडची उलाढाल वर्षभरात करत आहेत.
- प्रदुषण महामंडळाचे अधिकारी माईन्सवर किती प्रमाणावर प्रदुषण आहे हे तपासण्यासाठी येतात परंतु माईन्सवर सर्व प्रकारचे काम बंद असते तेव्हा ते यंत्र घेवून तपासणी करतात. तेव्हा त्यांना योग्य तो रीपोर्ट मिळत नाही. इत्यादी.

२) **श्री.सचिन श्रीकांत गुरव (उपसरपंच) गा.पं.हरेश्वर,रा हरेश्वर, ता.श्रीवर्धन, जि.रायगडः**
मे.आशापुरा माईन्स कं. लि. या कंपनीचे गेली १२ वर्ष सलग श्रीवर्धन तालुक्यात अनेक भागात उत्खनन सुरु असुन गडबवाडी गावच्यातगत ५० मीटर अंतरावर कंपनीचे उत्खनन सुरु आहे. त्यामुळे गावातील घरांना धोका निर्माण झाला आहे. तसेच मारळ व काळीजे दोन्ही गावे डोंगर माथ्याच्या खाली असल्याने पुणे जिल्हयातील माळीण गावासारखा प्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जिवीतहाणी होण्याची दाट शक्यता आहे. भविष्यात असे घडल्यास त्यास प्रशासन की कंपनी जबाबदार राहणार ? तसेच या भागात होणाऱ्या बॉक्साईटच्या वाहतुकीच्या डंपर्समुळे अनेक अपघात होवुन अनेक लोकांना आपला जीव गमवावा लागला. तसेच याभागातील गावांना पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे.पर्यटन व्यवसायावरती देखील त्याचा परीणाम झाला आहे. आपण या संपूर्ण गोष्टीचा विचार करुन कंपनीला मुदतवाढ देवू नये, नाहीतर जनता तीव्र आंदोलन करेल. इत्यादी.

३) **श्री अशोक बुरुणकर ग्रामस्थ व महिला कुरवडे, ता.श्रीवर्धन, जि.रायगड :**
कुरवडे गावानजीक गडबवाडी गावाच्या लगत ५० मीटर अंतरावर मे.आशापुरा माईन्स कं. लि. यांचे उत्खनन सुरु आहे. त्यामुळे आसासच्या घरांना धोका निर्माण झाला आहे. तसेच मारळ, कुरवडे व काळींजे ही गांवे डोगर माथ्याखाली असल्याने पुणे जिल्हयातील माळीण गावासारखा प्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जीवीत हानीही होऊ शकते. बॉक्साईटच्या वाहतुकीच्या डंपर्समुळे अनेक अपघात वाढत आहेत. उत्खननामुळे जिवंत पाण्याचे झरे गायब झाले आहेत. त्यामुळे हरीहरेश्वर, बाणगंगा, मारळ, साक्षीभैरी या गावांना पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे.
त्यामुळे या सर्व गोष्टींचा विचार करुन कंपनीला मुदतवाढ देऊ नये; नाही तर आम्ही ग्रामस्थ तीव्र आंदोलन करु. इत्यादी.

४) **ग्रामपंचायत सायगांव, ता.श्रीवर्धन, जि.रायगडः**
ग्रामपंचायतीचा प्रकल्पास विरोध आहे. गेली कित्तेक वर्ष बॉक्साईट उत्खनना संबधी सायगाव ग्रामपंचायतीची परवानगी घेण्यात आली का याबाबत आशापूरा माईनकेम लि. कंपनीकडे पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु परवानगी विषयी माहीती दिलेली नाही. त्यामुळे सदर उत्खनन बेकायदेशीर आहे. सायगाव माईनिग क्षेत्रात २५ ते ३० फुट खोदकाम झाल्यामुळे डोंगराच्या बाजुला उंचकडे तयार होवून दरडी कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. सायगाव मधील विहीर, विंधनविहीर जानेवारी महीन्यातच कोरडी पडत असून पाण्याची टंचाई भासत असते. या सर्व गोष्टी कंपनीच्या निदर्शनास आणुन देखील अद्याप पर्यंत पायाभुत, मुलभुत व सामाजीक सुविधा दिलेल्या नाहीत. तसेच सामाजिक विकासाअंतर्गत निधी मिळालेला नाही. त्यामुळे सदरचे उत्खनन त्वरीत बंद करावे. इत्यादी.

५) **श्री.नितीन शरद वैद्य, रा.त्रिमुर्ती गतिगंगा सोसायटी, कर्वेनगर, पुणे :**
- **श्री.श्रीकांत पुरशोत्तम परांजपे, रा.आशीष अपार्टमेंटस्, डेक्कन जीमखाना, पुणे :**
- **श्री.शशांक पुरशोत्तम परांजपे, रा.रजत अपार्टमेंटस्, डेक्कन जीमखाना, पुणे :**
- **श्री.राहूल श्रीकांत परांजपे, रा.आशीष अपार्टमेंटस्, डेक्कन जीमखाना, पुणे :**
- **श्री.वसंत गजानन यादव, नवी पेठ, श्रीवर्धन, ता.श्रीवर्धन, जि.रायगड :**

सदर खाणकामामुळे जमिनीची धूप होणार आहे. सदर खाणकामामुळे आतिल पाण्याचा स्त्रोत कायमचा बंद होणार आहे. वृक्ष तोड होणार आहे. जमिनीची धूप होणार आहे. खूप मोठा खड्डा पडणार आहे. जमिन कसण्यालायक राहणार नाही. पाण्याचा तुटवडा निर्माण होणार आहे. दरड कोसळण्याचा संभाव्य धोका आहे. या सर्व बाबींचा विचार करुन नियोजित प्रकल्प रद्द करावा, इत्यादी.

अध्यक्षांनी प्रकल्प प्रतिनिधीनां विनंती केली की, लोकांनी उपस्थीत केलेल्या सर्व प्रश्नांची नोंद घ्यावी. त्या पुढे म्हणाल्या की, पर्यावरण संबंधातील प्रश्न आणि इतर स्थानिक समस्या राज्य स्तरीय विशेषज्ञ मुल्यांकन समिती यांच्याकडे अहवाला मार्फत पाठविले जातील. पुढे त्यांनी लोकांना असे सांगितले की सर्व मुद्दे नमुद केले गेले आहेत, जनसुनावणीचे चित्रीकरण केलेले आहे. त्याप्रमाणेच इतिवृत्त बनविले जाईल.

मा. अध्यक्षा तथा जिल्हा दंडाधिकारी यांनी उपस्थितांनी पोटतिडकीने अनेक समस्या सांगितल्या बद्दल उपस्थितांचे आभार मानून जन सुनावणी संपल्याचे घोषित केले.

( सागर औटी)
समन्वयक तथा उप-प्रादेशिक
अधिकारी
म. प्र. नि. मंडळ, महाड.

( शीतल तेली-उगले)
अध्यक्षा, जिल्हा दंडाधिकारी तथा
जिल्हाधिकारी, रायगड.

**The Minutes of Public Hearing in respect of proposed expansion in production of Kurwade-Maral Bauxite Mine of M/S Altage Stone Crushing Industries, at Village Kurwade – Maral, Taluka - Sriwardan ,District Raigad, Maharastra.**

**Venue:Kurwade – Junction, Harihareswar Road, Kurwade Village,Taluka**

**Sriwardan, District Raigad.**

**Date: 26/ 10/ 2015**

Timing: - 11.00 am.

M/S Altage Stone Crushing Industries at Village Kurwade – Maral ,Taluka – Sriwardan, District –Raigad, Maharashtra,Kurwade-Maral Bauxite Mine proposed expansion from 12000 Tons per Year to 89586 Tons per Year, Public Hearing conducted on dated 26/10/2015 at 11.00 am. AtKurwade –Junction, Harihareswar Road, Sriwardan, District Raigad, Maharashtra under the Chairmanship of Madam ShitalTeli- Ugale, District Collector, Raigad, Maharashtra. Chairperson was welcomed by ShriTajesSamelSub Divisional Officer, Sriwardan with flower bouquet.

Name of Persons present on dais:

| | | |
|---|---|---|
| Mrs.ShitalTeli-Ugale | : | Chairperson, District Magistrate and District Collector. |
| Shri. TajesSamel | : | Sub Divisional Officer, Sriwardan, Dist. Raigad. |
| Shri. RoshanMishram | : | District Mining Officer, Raigad |
| Shri. Dr. AnantHarshwardhan | : | Regional Officer, M.P.C. Board, Raigad |
| Shri. S. V. Auti | : | Convener and Sub-Regional Officer, M.P.C. Board, Mahad |

**To begin with Dr. AnantHarshwardan, RO-MPCB, Raigad**addressed the gathering with welcome note to the Chairperson and audience for public hearing.

**Thereafter, Shri. SagarAuti SRO-MPCB, Mahad**has told that today's public hearing starts with permission of Chairperson Madam Ugale District collector Raigad and welcomed on behalf of MPCB and Collector Office explained the audience about the purpose of conducting public hearing as per EIA Notification 2006. He also informed the present public that the advertisement regarding same was published in the local daily **'Raigad Times'** Marathi Newspaper as well as in daily**'The Indian Express'** English Newspaper dated 25/09/2015. At the same time, he informed that in the advertisement, it was mentioned that anybody who has any objections, suggestions to the proposed expansion project was free to submit it to the local office of MPCB within 30 days from publishing of the notice. The convener further informed that the office has received five letters. He informed that to conduct this public hearing committee was constitutedand order was passed by Member Secretary of Board with reference number 4449, E-225 dated 17/10/2015. He has told audience present that they can raise their question by saying their name and name of village from where he or she is and proponent will answer them. The minutes of meeting will be sent to Head Quarter of Board. This committee has not having any

power to take decision. The minutes of Public Hearing meeting will be sent to State level Expert Appraisal Committee. Then he requested project proponent to start presentation.

**Shri. ShantanuPuranik (ShrustiSeva)** on behalf of project proponent gaveComputerized Power Point presentation to the public in local language regarding the project and need for expansion of production with power point presentation.

**Thereafter Dr. AnantHarshwardan, RO-MPCB, Raigad**, appealed to the people to raise their queries, objections, suggestions or comments on proposed expansion of production from Mines one by one from the audience.

The details of question raised during public hearing and their answers given by proponent / respective authorities are given below:

1. **Shri. Ajit Shankar Bhatkar (Bangmadla Village)** thanked 50 % to District Collector and Government officials for conducting Public Hearing. He said that, public hearing notice have not been given in the local newspaper, He said farmers are from Raigad and notice was not published on Raigad edition. If it is published then he will thanks 200% and also appealed to Government officials to visit mining site as systematic working is not carried out in the mines.

Regional Officer MPCB Raigad, brought in the notice of the public that, Public Notice was exhibited in Marathi local daily newspaper **'Raigad Times'** dated **25/09/2015** and executive summary of project was kept at District Collector Office, Tehsil office, Zillah Parishad office and concern Gram Panchayat for public to study.

2. **Shri.RajkumarChavan (Harihareshwar)** said that, company doesn't follow terms and condition of law while mining. Very less compensation was paid to land owners and agreement has been carried out on Hundred Rupees Stamp Paper. Due to Mining operations Fauna from mining area migrated to village habitation. Due to transportation rate of road accidents has been increased. Back filling and plantation hasn't been carried out in mining area. Excavation in Mines is more than five meter. Also raised point over putting photocopy of newspaper advertisement instead of newspaper itself in Gram Panchayat. He has told that Arabian Sea is at a distance of 500 meter and raised question whether company has taken required permission for mining operation. Objection was raised that MPCB official not carrying out inspection of mining project.Hence permission may not be given to project.

**Regional Officer Dr. Harshwardan**informed that, official from SRO,MPCB,Mahad carries out inspection regularly and also issue notice, if required. Proponent also informed that all required permissionshave been obtained for mining and also informed Executive summary of project was kept at District Collector Office, Tehsil office, Zillah Parishad office and concern Gram Panchayat for public to study.

**Shri ShantanuPuranic** has informed that today's public hearing is for expansions of production from mine. Working on Government land for mining project is with consent and due permission and private land is used with consent and with mutual agreement of land owner. All points raised are noted in the minutes and it will be included in final EIA/EMP report.

3. **Shri. ArvindBhojane (Village Kurwade)**, said villagers will decide about mining operations. Village Kurwade is about 300 meters from mining site, possibility of incident like Malini village of Puna. How many job have been provided to villagers. Mines is operated for last 15 years. Also asked about the financial help provided by company to the villagers. Simultaneously raised point that villagers have requested Rs.15,00,000 /- from company for construction of Temple but company has agreed only for Rs. 6,00,000/- and paid only 50 percent. Also informed that company has agreed for road repair but so far nothing has been done.

**Project proponent**told that villagers issue if any are sorted out.Rs. 6, 00,000 /- has been sanctioned for Temple construction, from that Rs. 3, 00,000 /- has been paid balance will be paid as per progress of Temple construction. Road repairing work will be carried out in the month of January 2016. CSR activity are carried as per production limit. CSR activity are not carried as expectation of villagers. On proposed expansion of production Rs. 900,000 /- will spent in village on CSR activities.

4. **Shri. JanardhanPandyal (Village Kurwade)** said villagers will decide whether to permit or not. Capacity of Mine production is 12000 Tons per year, but production of 1 lack tons has been carried out. Any arrangement is been done for dust suppression, how many health camp has been organized. 10 to 12 persons died due to TB. Kurwade village is situated at a distance of 1 km from the mining lease area, and asked about company's contribution towards village development in last six years. Due to heavy traffic road has been spoiled. Due to blasting natural springs depleted because of that scarcity of water in village. Company doesn't have financial transparency. Because of Mining resident faces health problem, they faces loses to their agriculture fields and fruits gardens,

**Project proponent informed** that mining operations will be carried out maximally with the help of Ripper and Dozer. If required, controlled blasting practice followed by mille second delay detonators will be used. For dust suppression water sprinkling on road will be carried out in future also. Sapling will be planted.

5. **Shri. ArvindBhojane (Village Kurwade)** raised points asking about, how many villagers have been given employment for last 15 years and what company will do for water scarcity. He also informed that, villagers have constructed a well under Bharat Nirman Scheme but because of blasting it is polluted and not potable. If company pays 3 lack in 9 year then how to think company will spend 9 lack in every year. Now there is a scarcity in village what will be done.

Project proponent has replied that company has provided employment under skilled and unskilled categories for two peoples from village. Under CSR Rs 9 lack per year will utilized for water scarcity of water and for other work of village.

6. **Mrs. PadmshriBurankar (Village Kurwade)** raised question about health and water, similarly she has raised caution against sliding of hill due to mining. Also added that it becomes difficult to move on road due to heavy vehicular traffic.

**Project proponent** assured villagers water supply issue will be sorted out, will arrange for bore-well in village.

7. **Shri. DashratLaxmanLokhande (Kurwade),** 5 Year ago due to heavy rain village road waspiled with muck and silt and it wasdifficult for villagers to walk on road. Mining operation going for last 9 years but company has not carried out any social development in village, to whom 3 lack has been paid, politician takes away, villagers has to keeps their mouth mum and calm. Domestic animals dies but company not doing anything, also dissatisfy with mining company.

8. **Shri.NareshPulekar (Harihareswar),** due to mining facing losses in 10 K.M. periphery, Wild animals creating nuisance to fruit bearing trees.Information may be given that how many closed mining pits are back filled and number of plantation carried out. They should follow all Government rules during mining, MPCB and Revenue department should keep control. Government should take consent for mining from villagers a resolution from 10 K.M. periphery villages. Company name has been changed from Ashapura to Alatge.

**Project proponent informed** that company name has not been changed, company name is Alatge Stone Crushing Industries who are miners and Ashapura Company purchases ore from us. Till so far not a single mine is closed.

9. **Shri. SunilKhale (Dy. SarpanchMaral),** said that mines are operated for last 9 years. Earlier transport of bauxite was carried out via Kurwade Jetty but now transport is done to Digi Port. Dumpers are overloaded, operated by non-license driver and because of that rate of road accidents are increased, children's, animals are died. Mango groves, agriculture land spoiled. One lady lost fingers of hand due to blasting gelatin, she has become handicapped. What percent of contribution from royalty for Maral village got. Overload bauxite transport on forest road. Road accident increased, no employment for villagers. Also raised point that, land agreements has been done at low price with farmers.Company has not spent CSR fund which was forRs. 3, 00,000 /- for Anganwadi (pre-primary), Rs. 1, 00,000 /- for Women self-help group, Rs. 1, 00,000 /- for School children Uniforms, Rs. 1,00,000/- for Health camp and Rs. 1, 50,000 /- for Road repairs. Villager's faces problem due to wild animals, no employment is generated. Government should start refinery hear itself instead of exporting Bauxite ore.

**Project proponent informed** that CSR Fund details raised by Shri. SunilKhale is the proposed budget comes under CSR activity for the proposed expansion project. Also suggest to form one villagers committee and under their suggestion this fund will be utilized.

10. **Shri. ArvindBhojne (Kurwade),** Companies production is more than the permitted limit, to know their daily production report may be checked, company should produce balance sheet of kurwade then it will come to understand what yearly production was. Company should pay for village development fund on production instead of sanction CSR fund of Rs. 900,000/-.

11. **Shri.NathuramSawant (Kurwade),** saidfrom the day mining company started their mining operation natural water source effected, Villagers done boring for well but they doesn't got water for their bore well. In personal inspection it appears that excess excavation has been carried out.

12. **Mr.Nijamuddin Jalal (Environmentalist- Mahad),** said because of mining ground water source depleted and that is the cause for water scarcity. Since Kokanarea receives heavy rain and because of blasting there is a danger of land sliding. Also added that because of mining

and its transport dust there is a loss for fruits and fruit bearing grooves and compensation may be given after assessing.

13. **Shri.RajkumarChavan (Village Harihareshwar),** again said that there is no weigh-bridge at mines, because of that, all dumpers are overloaded and for this AshapuraCompany is responsible. They should follow all earlier terms and condition of mining, before that they should not be permitted for expansion of mining production.

14. **Shri. AjitBhatkar (Village Bagmandala)**said, there is contempt of Supreme Court order. Mining can't be done on Grazing land. If mining has been carried out then fine may be imposed on company.

15. **Shri.SandipJhadav (Village Harihareshwar)**said if action is not taken against company then they will appeal to Green Tribunal.

16. **Shri. AjitBhatkar (Village Bagmandala) said,** He is suspicious on Contractors laborers that they have stolen a Golden Idol of Ganesh from Diveghar Temple so suggested that all information and records of laborers should be given to local Police station and Magistrate office.

17. **Shri. Santosh Jhadav (Press Reporter)**said on mining project land some area is marked on 7/12 as forest and ban on any work. What action will be taken if mining is done in that area.

Sub Divisional Officer, Shriwardhanhas assured that he will carry out inspection and action will be taken.

18. **Mr. MaksudNazir (Shriwardhan)**said that any action will be taken where mining is done in Grazing land.

Chairpersonand District Magistrate, Raigad,has assured that inspection will be carried out and fine will be imposed.

Also, MPCBMahad received written representations from local peoples in their office and during public hearing are enclosed along with minutes. The brief summary of their letter is mentioned here below

1, **Shri. AdeshKrisnaPatil, Resident of SriwardanDanda, Tal. Sriwardan, Dist. Raigad:**

Village's drinking water has been polluted, source of water depleted and water is supplied by tanker. Mining is carried out in section 35 area. Due dip pits in mines domestic animals dies after falling in the pits, tree felling has been done, environment has effected and it's has affected the rainfall. Last ten year environmental mining plan submitted to government has not been followed and villagers has to suffer its effect, lungs diseases and on health of children's. Company shows that plantation has been carried out but it's after care has not been takeneverywhere dusty condition. For last 10 to 13 years company operates mines at Megre, Kurwade, Saigao and Kujare but till now not carried out any village development work. Please check the daily production report of last ten year will

find differences of royalty paid and production carried out in mines. Company promises the employment for villagers but deploys machinery for operation. Land has been acquired on agreement at very low rate but company earns in dollars and companies' turnover is in 1800 to 2000 cores. Pollution control board officers visits mines for inspection only when mines operation stops and doesn't gets correct reports.

2. **Shri SachinSrikantGurav (Dy. Sarpanch) Gram PanchayatHarihareswar, Res. Hareshwar, TalukaSriwardan, Dist. Raigad.**

M/S Ashapura Mines Company Ltd operates mines for last 12 years. Excavation at Gadabwadi50 mtr from where mining is going on. There is danger to our houses in surroundings. Maral, Kurwade&Kalinje villages are located at foothills and there is possibility of loss of life and if incidents like Malin village of Dist. Pune will happen, then who will be responsible .There are accidents in this area due to Bauxite transportation. Villagers suffer water scarcity, Tourism effected. Considering all extension should not be given for company.

3. **Shri. Ashok Burunkar& Villagers of Kurwade,Tal.Shriwardhan, Dist.Raigad:**

Near Kurawade village there is Gadabwadi at 50 mtr from where mining is going on. There is danger to our houses in surroundings. Maral, Kurwade&Kalinjevillages are located at foothills and there is possibility of loss of life and if incidents like Malin village of Dist. Pune will happen, thenwho will be responsible .There is increase in accidents due to transportation of bauxite by dumpers.Due to mining operations at hill top, we faces water scarcity.

Government has developed water scheme for Harihareshwar,Bajganga, Maral, Sakshibhairi villagesby spending around 15 crores, and due to mining activities source point of water has been effected and our villages are facing water shortage problems.

Therefore, please do not permit the extension to mining; otherwise we villagers will start agitation.

4. **Grampanchayat Saigaon, Tal. Shriwardhan, Dist. Raigad**

Mentioned that, mining activities has been carried out with 25 – 30 feet pits causing degradation to environment. Also mentioned that, water course of that area is diverted and it has been observed from last 4 – 5 years that wells of the area getting dry in the month of January. Further mentioned that company has promised to do social welfare but nothing has been done. Requested collector about the CSR fund and 20% of the royalty for development of village.

5. **Shri. NitinSharad Vaidya, TrimurtiGitganga Society, Karvenagar, Pune-52:**

- **Shri ShrikantPurshottamParamnjpe, Ashish Apartments, Deccan Gymkhana, Pune-04:**
- **Shri.ShanshankPurshottamParanjpe, Rajat Apartments, Deccan Gymkhana, Pune-04:**
- **Shri.RahulShrikantParanjpe, Ashish Apartments, Deccan Gymkhana, Pune-04:**
- **Shri.VasantGajananYadav, NaviPeth, Shriwardhan, Dist.Raigad:**

1. Due to mining, land erosion will be there.
2. Due to mining, ground water source will be depleted.
3. Fellingthe number of trees and land erosion will take place due to mining.
4. Due to mining, land owner will not able to do farming activities.

5. Due to mining, there will be big pit and by it is observed that company has not backfilled the pits.
6. Land will not be cultivable.
7. Due to this project, water scarcity may be occur for Kurwade village.
8. Kurwade village is at foothill and there is danger of land sliding.

By considering all above points, there is request for cancellation of proposed project.

The Chairperson requested the project representative to note all the questions raised during the public hearing. She further said that report on environment related questions and other local issues will be forwarded to the concern authority. Further she informed the people that all the points have been noted, public hearing has been video-graphed and points will be included in the minutes and forwarded for further action.

Chairperson and District Magistrate, Raigadconcluded and declared the public hearing ended with thanks to all who were present for public hearing.

([illegible] S. V. Auti)
**Convener &Sub Regional Officer, Mahad**

([illegible].ShitalTeli-Ugale)
**Chairman &District Magistrate and District Collector**